BRITISH COUNCIL

सत्यमेव जयते
Government of Maharashtra
महाराष्ट्र शासन

प्रेस रिलीज

# महाराष्ट्र सरकार आणि ब्रिटीश कौन्सिलद्वारे उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणासाठी सामंजस्य करारा (MoU)वर स्वाक्षरी

- *उच्च आणि तांत्रिक शिक्षण विभाग आणि ब्रिटिश कौन्सिल यांच्या द्वारे अभ्यासक्रमाची गुणवत्ता वाढविण्यासाठी, प्रशिक्षण अध्यापकांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि नेतृत्व कौशल्य विकसित करण्यासाठी, गतिशीलता सहाय्य करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पुढाकार*

**मुंबई, 25 एप्रिल, 2023:** शैक्षणिक संधी आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी ब्रिटनची आंतरराष्ट्रीय संस्था असलेले **ब्रिटीश कौन्सिल**ने आणि **महाराष्ट्र सरकारच्या उच्च आणि तांत्रिक शिक्षण विभागा**ने राज्याच्या ज्ञान आणि आर्थिक विकासाच्या आकांक्षांना प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण बळकट करण्यासाठी **सामंजस्य करारा (MoU)वर स्वाक्षरी केली आहे.** हे महाराष्ट्र सरकारच्या महत्वाकांक्षेशी आणि तरुणांसाठी संधी, दर्जेदार उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासाठी त्याच्या कामाशी सुसंगत आहे.

**महाराष्ट्र सरकारचे माननीय मंत्री चंद्रकांत बी. पाटील, उच्च आणि तांत्रिक शिक्षण विभाग आणि ब्रिटीश कौन्सिल इंडियाचे संचालक एलिसन बॅरेट एमबीई** यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारा (MoU)वर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. **श्री. विकास चंद्र रस्तोगी, आयएएस (IAS), प्रधान सचिव उच्च शिक्षण आणि राशी जैन, निदेशक पश्चिम भारत, ब्रिटीश कौन्सिल यांनी सामंजस्य करारा (MoU)वर स्वाक्षरी केली.**

या करारामुळे महाराष्ट्रातील कौशल्य आणि उच्च शिक्षणाची गुणवत्ता बळकट करण्यासाठी, महाराष्ट्र सरकार आणि ब्रिटीश कौन्सिल इंडिया यांच्यातील सध्याच्या भागीदारीला पूरक ठरेल. या भागीदारीचा उद्देश हा, तरुणांना उच्च दर्जाचे शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील मापदंडकृत (बेंचमार्क्ड) मूल्यांकन; कौशल्ये आणि पात्रता; आणि संस्कृती, सर्जनशीलता आणि कल्पनांची देवाणघेवाण या बाबींमध्ये संधी प्रदान करणे आहे.

या करारानुसार, ब्रिटिश कौन्सिलद्वारे महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणासाठी, संशोधन आणि गतिशीलता यासाठी मदत पुरविली जाईल. परस्पर हिताच्या क्षेत्रात, ज्ञान देवाणघेवाण आणि सहकार्यासाठी **संधी निर्माण करण्यासाठी राज्य सरकारला सक्षम करण्यासाठी** हा करार करण्यात आला आहे. या दोन्ही संस्था महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण परिसंस्थेला बळकट करण्यासाठी काम करतील ज्यामध्ये **क्षमता निर्माण आणि**

**नेतृत्व विकास आणि शिक्षकांसाठी प्रशिक्षण**. आंतरराष्ट्रीयीकरणाच्या अजेंड्याला पाठिंबा देण्यासाठी, समोरासमोर आणि आभासी कार्यशाळा, प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि ज्ञानाची देवाणघेवाण यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

या भागीदारीची अमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र सरकार आणि ब्रिटीश कौन्सिलचे प्रतिनिधी एक कार्य गट (वर्किंग ग्रुप) तयार करतील

**विकास चंद्र रस्तोगी, आयएएस (IAS), प्रधान सचिव उच्च शिक्षण, महाराष्ट्र सरकार,** म्हणाले, *"महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्थांचे आंतरराष्ट्रीयीकरण व्हावे अशी आमची इच्छा आहे आणि भारत आणि यूके (UK) यांच्यातील सहकार्य वाढेल अशा संधी निर्माण करायच्या आहेत, ज्यामुळे राज्यातील तरुणांचे कौशल्य आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल. आम्ही चांगले संशोधन आणि विकास सुविधा तयार करण्यासाठी यूके (UK) उच्च शिक्षण संस्थांसह उच्च दर्जाची भागीदारी विकसित करण्यास उत्सुक आहोत आणि आम्ही राज्यभरातील विद्यार्थ्यांच्या जीवनात ठोस सकारात्मक परिणाम घडवून करण्याची आशा करतो.*

**ब्रिटीश कौन्सिल इंडियाचे संचालक, एलिसन बॅरेट एमबीई** म्हणाले, *"ब्रिटीश कौन्सिल म्हणून आम्ही, सामायिक स्वारस्ये आणि अभ्यासाच्या क्षेत्रांवर सहयोगाला प्रोत्साहन देऊन, भारत आणि यूके (UK)मधील संस्थांमधील संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करतो, ज्यामुळे आम्हाला एकत्रितपणे जागतिक आव्हानांचा सामना करण्यास मदत होऊ शकते. महाराष्ट्रासोबतच्या या कराराअंतर्गत, आम्ही धोरणकर्त्यांना पातळी वाढवणे आणि उत्कृष्टतेला चालना देणारे वातावरण तयार करणे, यांच्याविषयी संस्थात्मक प्राधान्यांशी परिचित होण्यासाठी, त्यांना उच्चस्तरीय धोरण संवादांमध्ये समाविष्ट करू. आम्ही एकत्रितपणे विद्यार्थ्यांचा अनुभव आणि रोजगारक्षमता सुधारण्याचे आणि महाराष्ट्रासाठी चांगले सामाजिक - आर्थिक भविष्य निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवतो.*

**ब्रिटीश कौन्सिलचे पश्चिम भारताचे संचालक, श्री. राशी जैन** म्हणाले, *"उच्च शिक्षणाच्या अध्यापकांना आणि कर्मचाऱ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी नवीन कौशल्ये, संसाधने आणि पद्धतींसह सशक्त करण्याच्या आमच्या सामायिक उद्देशाने, आम्ही महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक आहोत. उच्च शिक्षण प्रणालीस सक्षम करून, आम्हाला आशा आहे की, नवीन कार्यक्रमाचा महाराष्ट्राच्या ज्ञानाच्या महात्वाकांक्षावर आणि आर्थिक विकासावर मोठा परिणाम होईल. राज्यासोबत आमच्या दीर्घकालीन संबंधांमध्ये हा एक महत्वपूर्ण पुढाकार आहे आणि हा उपक्रम राज्यभरातील शिक्षणाच्या परिवर्तनात्मक वितरणात रूपांतरित होईल याची खात्री करण्यासाठी आम्ही एकत्रितपणे काम करण्यास वचनबद्ध आहोत जेणेकरून तरुण विद्यार्थ्यांना फायदा होईल.*

**ब्रिटीश कौन्सिल बद्दलः**

ब्रिटीश कौन्सिल ही, ब्रिटनची सांस्कृतिक संबंध आणि शैक्षणिक संधींसाठीची आंतरराष्ट्रीय संस्था आहे. कला आणि संस्कृती, शिक्षण आणि इंग्रजी भाषेच्या माध्यमातून आम्ही यूके (UK) आणि इतर देशांमधील लोकांमध्ये संबंध, समज आणि विश्वास निर्माण करतो. गेल्या वर्षी आम्ही 80 दशलक्ष पेक्षा अधिक लोकांपर्यंत थेट पोहोचलो आणि ऑनलाइन आणि प्रसारण आणि प्रकाशने या माध्यमांतून एकंदरीतपणे 791 दशलक्ष लोकांपर्यंत पोहोचलो. 1934

मध्ये स्थापित, आम्ही रॉयल चार्टर आणि यूके (UK) पब्लिक बॉडीद्वारे शासित यूके (UK) चॅरिटी आहोत. आम्हाला यूके (UK) सरकारकडून 15 टक्के कोअर फंडिंग अनुदान प्राप्त होते. www.britishcouncil.in